आर.सी.सी. क्र. १०७/२०१३
शासन वि. सुदाम व इतर
नि.क्र. १०४

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. २ याची जबानी शपथेवर सुरु**

मी सत्य प्रतिज्ञेवर कथन करते की,

माझे नाव – कविता सुदाम सहाने

वय – ३२ वर्षे, व्यवसाय – घरकाम

रा. टाकळी, नाशिक ता. जि., नाशिक

-----------------------------------------------

**सरतपास – अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील श्रीमती आर. बी. जाधव यांचे द्वारा–**

आरोपी क्र. १ हा माझा पती असुन इतर आरोपी हे आरोपी क्र. १ याचे नातेवाईक आहे. आरोपींनी मला काहीही त्रास दिलेला नाही. तसेच त्यांनी मला कधीही मारहाण केलेली नाही व शिवीगाळ देखील केलेली नाही. आता मला दिनांक २५.०२.२०१३ रोजीची फिर्याद दाखविण्यात आली. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर मला माहिती नाही. फिर्यादवरील सहीस नि.क्र. १०५ देण्यात येते.

**साक्षीदार अभियोग पक्षास सहकार्य करत नसल्याचे कारण देऊन सरकारी वकीलांनी केलेल्या तोंडी विनंतीवरुन साक्षीदारास उलट तपासात विचारात येण्याजोगे उत्तर सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी देण्यात आली.**

२. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी हे मला घर घेण्याकरिता एक लाख रुपये घेवुन ये, या कारणास्तव माझा छळ करत होते. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी हे मला मानसिक व शारिरिक त्रास देवुन मारहाण करत होते. आता मला फिर्यादमधील अधोरेखांकित भाग अ वाचुन दाखविण्यात आला. तो माझ्या म्हण्ण्याप्रमाणे नाही. तो पोलीसांनी तसा का लिहिला याचे कारण मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझी व आरोपींची न्यायालयाबाहेर तडजोड

झालेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी आरोपींना वाचविण्यासाठी न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास पुर्ण.**

**आरोपींतर्फे विधिज्ञ श्री. एस. एम. जोशी यांनी सदर साक्षीदाराचा उलटतपास नाकारला.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

दि.२१/०२/२०२६.

RUSHIKESH RAMDAS JADHAV
Digitally signed by RUSHIKESH RAMDAS JADHAV
Date: 2026.02.24 12:25:14 +0530

(ऋ.रा.जाधव)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी
न्यायालय क्र. २, सिन्नर.

आर.सी.सी. क्र. १०७/२०१३

शासन वि. सुदाम व इतर

नि.क्र. १०४

# C E R T I F I C A T E

I affirm that, the contents of this PDF file of Order/Judgment/Deposition are same word to word as per the original Order/Judgment/Deposition.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | S. M. Morankar |
| Court | : | 2nd Jt. Judicial Magistrate F.C., Sinnar |
| Date | : | 21.02.2026 |
| Deposition signed by the Presiding Officer | : | 21.02.2026 |
| Deposition Uploaded on | : | 24.02.2026 |